प्रकरण सहावे

# संशोधनाचा सारांश, निष्कर्ष व शिफारशी

६.१ संशोधनाचा सारांश

६.२ निष्कर्ष

६.३ शिफारशी

६.४ पुढील संशोधनासाठी विषय

प्रकरण – सहावे

# संशोधनाचा सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी

प्रकरण १ ते ४ मध्ये कनिष्ठ महाविद्यालयाच्या नियोजन आणि प्रशासनाचा आढावा घेतला आहे. वरील प्रकरणे ही तात्विक स्वरुपाची आहेत. प्रकरण पाचमध्ये प्राचार्य व शिक्षक यांच्या प्रतिसादाद्वारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन केले आहे. यावरुन संशोधकाने प्रस्तुत प्रकरणात सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी दिलेल्या आहेत.

## ६.१ संशोधनाचा सारांश –

### प्रकरण पहिले –

पहिल्या प्रकरणामध्ये संशोधनाची पार्श्वभूमी देवून संशोधनाची निवड कशी केली संशोधनाची उद्दिष्टे कोणती ? संशोधनाची गृहितके कोणती ? संशोधनाची गरज काय व त्याचे महत्व कोणते इत्यादी प्रकारची माहिती दिली आहे. तसेच प्रकरणात नियोजन करण्यात आले आहे. तसेच संशोधनाची व्याप्ती व मर्यादा याचा ही उल्लेख करण्यात आलेला आहे.

### प्रकरण दुसरे –

यामध्ये प्रस्तुत संशोधनासाठी पूरक विविध संदर्भ ग्रंथाचा अभ्यास करुन आवश्यक ती माहिती मिळवण्यात आली आहे. यामध्ये एकूण ११ संबंधित संशोधनाचा व दोन शैक्षणिक मासिकांचा अभ्यास केला आहे.

### प्रकरण तिसरे –

यामध्ये कनिष्ठ महाविद्यालयातील नियोजनाचा अभ्यास करताना नियोजनाची व्याख्या, गरज, महत्व इत्यादी विषयी माहिती दिली आहे. कनिष्ठ महाविद्यालयाच्या नियोजन आणि प्रशासनातील विविध घटकाची माहिती देण्यात आली आहे ती पुढीलप्रमाणे –

१) प्राचार्य – शैक्षणिक पात्रता व व्यावसायिक पात्रता, अधिकार व कर्तव्य.

२) प्राध्यापक –शैक्षणिक, व्यावसायिक पात्रता, कार्यभार, कर्तव्ये इत्यादी विषयी.

३) विद्यार्थी - वय, शाखा निवडण्याचे स्वातंत्र्य इत्यादी.

४) विद्यार्थी संख्या व तुकड्या.

५) इमारत.

६) फर्निचर.

७) ग्रंथालय.

८) प्रयोगशाळा.

९) शैक्षणिक साधने.

१०) स्वच्छतागृहे.

११) परीक्षा व मूल्यमापन.

१२) अभ्यासपूरक उपक्रम.

१३) सेवांतर्गत प्रशिक्षण.

इत्यादी वरील घटकांची सविस्तर माहिती दिली आहे.

**प्रकरण चौथे –**

प्रकरण चार मध्ये खालील घटकांची माहिती देण्यात आली आहे.

**संशोधन पद्धती –**

संशोधनाच्या प्रमुख तीन पद्धतींची माहिती देवून सर्वेक्षण पद्धतीची सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे.

**नमुना निवड –**

यामध्ये नमुनानिवडीचे महत्व सांगून नमुना निवड कशी केली त्याबद्दल सविस्तर माहिती दिलेली आहे. नमुन्यामध्ये ७० शिक्षक व ५ प्राचार्यांची निवड केली आहे.

**संशोधनाची साधने –**

शैक्षणिक संशोधनाच्या विविध साधनांचा अभ्यास करून प्रस्तुत संशोधनासाठी लागणाऱ्या साधनांची माहिती दिली आहे. प्रस्तुत संशोधनासाठी खालीलप्रमाणे साधने वापरली आहेत.

**१) प्रश्नावली –**

शिक्षकांकडून माहिती गोळा करण्यासाठी प्रश्नावली चा वापर केला.

**२) मुलाखत –**

प्रस्तुत संशोधनासाठी आवश्यक माहिती मिळविण्यासाठी प्राचार्यांच्या मुलाखती घेतल्या.

**प्रकरण पाचवे –**

यात खालील प्रकारच्या माहितीचे संकलन करुन विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात आले आहे.

**६.२ मुलाखतीच्या आधारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन –**

प्राचार्यांची वैयक्तिक्र माहिती, कनिष्ठ महाविद्यालयाच्या अंतर्गत बाबीसंबंधी माहिती संकलित केली. प्राध्यापक, विद्यार्थी नियोजन आणि प्रशासनाविषयी माहिती तसेच कर्मचाऱ्यांच्या नियोजन व प्रशासनाविषयी माहिती, भौतिक सुविधांविषयी माहिती तसेच आर्थिक बाबीविषयी माहिती, परीक्षाविषयी नियोजन व प्रशासनाची व कनिष्ठ महाविद्यालयातील नियोजन व प्रशासन सुधारण्यासाठी उपायांची नोंद करण्यात आली आहे.

**प्रश्नावलीद्वारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन –**

यामध्ये प्राध्यापकांकडून प्रश्नावलीद्वारे मिळालेल्या माहितीचे खालील घटकांच्या आधारे संकलन करण्यात आले आहे.

१) वैयक्तिक माहिती, प्रश्नासनासंबंधी सामान्य माहिती

२) अभ्यासक्रम विषयक, अध्यापन विषयक, ग्रंथालयविषयक माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात आले आहे.

वरील विविध घटकांविषयी माहिती मिळवून वर्गीकरण, विश्लेषण व अर्थनिर्वचन केले आहे. प्राप्त माहितीवरुन निष्कर्ष काढले व त्यासंदर्भात शिफारशी सुचविण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर पुढील संशोधनासाठी विषय सुचविले आहेत.

**६.३ निष्कर्ष**

**विभाग – १**

**६.३.१ प्राचार्यांच्या मुलाखतीवरुन आलेले निष्कर्ष –**

१) पंढरपूर शहरातील पाच कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्यांच्या घेतलेल्या मुलाखतीनुसार पाचपैकी चार प्राचार्य पदव्युत्तर तर एक पदवीधारक आहेत.

२) सर्व प्राचार्यांना शिक्षक म्हणून अनुभव हा १५ वर्षापेक्षा जास्त आहे.

३) तसेच सर्व प्राचार्यांना प्राचार्य पदाचा अनुभव हा दहा वर्षे पर्यंतचा आहे.

४) पंढरपूर शहरातील कनिष्ठ महाविद्यालयांमधून शिक्षण घेणारे सर्वात जास्त शास्त्र शाखेचे विद्यार्थी आहेत.

५) एक महाविद्यालय वगळता इतर चारही कनिष्ठ महाविद्यालयामध्ये तिन्हीही (शास्त्र,कला, वाणिज्य) शाखा आहेत.

६) पंढरपूर शहरातील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये शासकीय नियमानुसार पुरेशी शिक्षक व सेवक संख्या आहे.

७) पंढरपूर शहरातील सर्वच कनिष्ठ महाविद्यालयाला विद्यार्थी संख्येच्या मानाने पुरेशी इमारत नाही.

८) सर्वच कनिष्ठ महाविद्यालयातील वर्ग हे विद्यार्थी संख्येच्या मानाने पुरेसे आकाराने मोठे नाहीत.

९) एका कनिष्ठ महाविद्यालया व्यतिरिक्त इतर चारही कनिष्ठ महाविद्यालयामध्ये स्वतंत्र ग्रंथालय नाही.

१०) तसेच एकही ग्रंथालय संगणकीकृत केलेले नाही.

११) पंढरपूर शहरातील कनिष्ठ महाविद्यालयांतील जवळ जवळ सर्वच ग्रंथालयामध्ये वेगवेगळी मासिके मागविली जातात. पण इंग्रजी मासिके मागविली जात नाहीत. विषयानुसार मासिके मागविली जात नाहीत.

१२) शिक्षकांना बसण्यासाठी स्वतंत्र कक्ष आहे. पण तो पुरेशा प्रशस्त व सोयीसुविधांनी युक्त नाही.

१३) पंढरपूर शहरातील सर्वच कनिष्ठ महाविद्यालयामध्ये स्वतंत्र अशी प्रयोगशाळा नाही.

१४) पंढरपूर शहरातील चार कनिष्ठ महाविद्यालयांना पुरेसे क्रिडांगण आहे. पण एका महाविद्यालयाला क्रिडांगण नाही.

१५) प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालयामध्ये स्वतंत्र अशी स्वच्छतागृहे आहेत. पण ती पुरेशी व स्वच्छ नाहीत.

१६) पंढरपूर शहरातील सर्वच कनिष्ठ महाविद्यालयांमधून विद्यार्थ्यांच्या आरोग्याविषयी वेगवेगळे कार्यक्रम राबविले जातात. पण वैद्यकीय तपासणीचे प्रमाण कमी आहे.

१७) पंढरपूर शहरातील कनिष्ठ महाविद्यालयामध्ये स्वच्छ व पिण्याचे पाणी मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे.

१८) पंढरपूर शहरातील पाचपैकी चार कनिष्ठ महाविद्यालयामध्ये बोर्ड परीक्षांचे आयोजन केले जाते.

१९) बोर्ड परीक्षांचे आयोजन केल्याने फायदे कमी व तोटे ज्यादा होतात व ते पुढीलप्रमाणे आहेत.

**फायदे –**

१) विद्यार्थ्यांची सोय होते.

२) प्राध्यापकांना पर्यवेक्षणाचा अनुभव मिळतो.

३) विद्यार्थ्यांना आकरावीसाठी दुसरीकडे जावे लागत नाही.

४) शिक्षक व कर्मचाऱ्यांना ज्यादा मानधन मिळते.

**तोटे –**

१) सुट्टीचा फायदा मिळत नाही.

२) महाविद्यालयाच्या अन्य कामात अडथळा निर्माण होतो.

३) वातावरण तणावपूर्ण बनते.

४) विद्यार्थ्यांमध्ये शिस्त राहत नाही.

५) पर्यवेक्षणाच्या अडचणी येतात.

२०) प्रत्येक शिक्षकाच्या कामाच्या जबाबदाऱ्या या निश्चित केल्या जातात.

२१) जास्त विद्यार्थी संख्येमुळे अनेक दोष निर्माण होतात ते पुढीलप्रमाणे –

१) बसण्यास अडचण होते.

२) वर्गनियंत्रण होत नाही.

३) वैयक्तिक लक्ष देता येत नाही.

४) अपुऱ्या सोयी पडता.

५) गरजा पूर्ण होत नाहीत.

२२) सेवांतर्गत प्रशिक्षण घेवून आलेल्या प्राध्यापकांच्या अध्यापनात फरक जाणवतो व तो सकारात्मक असतो.

२३) प्राध्यापकांना सेवांतर्गत प्रशिक्षणासाठी पाठविले जाते. पण अशावेळी इतर शिक्षकांचा कार्यभार वाढतो.

२४) प्राध्यापकांच्या नियुक्तीच्यावेळी अडचणी येतात. त्या पुढीलप्रमाणे –

१) तासिकातत्वावर उमेदवार मिळत नाही.

२) अनुसूचित जाती व जमातीचे उमेदवार मिळत नाहीत.

२५) शिक्षकांच्या अध्यापनाचे निरीक्षण पदनिश्चय श्रेणी, निरीक्षण सूचीद्वारे केले जाते. पण नियमितपणे अध्यापनाचे निरीक्षण करणे प्राचार्यांना शक्य होत नाही.

२६) सर्वच्या सर्व कनिष्ठ महाविद्यालये अनुदानित आहेत.

२७) पाचापैकी चार कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राध्यापक अध्यापनाचे नियोजन करतात, तर एका महाविद्यालयांचे प्राध्यापक नियोजन करत नाहीत.

२८) पाचपैकी एका कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या इतर शाखांमध्ये बदल्या होतात.

२९) वेळ मिळेल तेव्हाच प्राचार्य अध्यापनाचे निरीक्षण करतात.

३०) शिक्षकांच्या अध्यापनातील चुका दूर करण्यासाठी प्राचार्य वेळीच उपाययोजना करतात. त्यासाठी ते त्यांना सूचना देतात.

३१) विद्यार्थी उपस्थिती वाढविण्यासाठी दंड करणे, पालकांना बोलावणे व बक्षिस देणे यासारख्या उपाययोजना केल्या जातात.

३२) कर्मचारी कमतरतेमुळे उपलब्ध लोकांवर कामाचा ताण पडतो व वेळेत कार्य पूर्ण करता येत नाही.

३३) वेळापत्रकाप्रमाणे कामकाज चालविताना अडचणी येत नाहीत.

३४) सन २००७-०८ मधील ११ वी व १२ वी चे जवळ जवळ ८५% पेक्षा जास्त निकाल लागले आहेत.

३५) पंढरपूर शहरातील पाच प्रतिसादक प्राचार्यांपैकी तीन प्राचार्यांच्या मते यावर्षीचे परीक्षांचे निकाल हे समाधानकारक आहेत.

३६) पंढरपूर शहरातील एका महाविद्यालयातील मुलांना स्पर्धेसाठी बाहेर पाठवले जात नाही.

३७) इयत्ता १२ वी च्या हुशार विद्यार्थ्यांना विशेष कोचिंग केले जाते.

३८) पाचपैकी तीन माध्यमिक शाळेला संलग्न तर दोन वरिष्ठ महाविद्यालयास संलग्न कनिष्ठ महाविद्यालये आहेत.

३९) अध्यापन कार्याचे नियोजन करावे म्हणून प्राध्यापकांना अनिवार्य केले जाते.

४०) पाचपैकी चार कनिष्ठ महाविद्यालयांना पुरेसे क्रीडांगण आहे.

४१) कामाची विभागणी समिती स्थापन करून त्यांच्याद्वारे केली जाते.

४२) कामकाजाचे नियोजन हे वर्षाच्या सुरुवातीस जूनमध्ये केले जाते.

४३) शैक्षणिक साधनांची खरेदी अनुदान व देणगीच्या रकमेतून केली जाते.

४४) गुणवत्तावाढीसाठी रात्र अभ्यासिका, वैयक्तिक मार्गदर्शन, तज्ञ व्यक्तींचे व्याख्यान व उजाळा वर्ग आयोजित केले जातात.

४५) कामकाजाचे नियोजन हे वर्षाच्या सुरुवातीस जूनमध्ये केले जाते.

४६) शैक्षणिक साधनांची खरेदी अनुदान व देणगीच्या रकमेतून केल जाते.

४७) गुणवत्ता वाढीसाठी रात्र अभ्याकि, वेयक्तिक मार्गदर्शन, तज्ञ व्यक्तींचे व्याख्यान व उजाळा वर्ग आयोजित केले जातात.

४८) उपक्रमाचा प्रमुख म्हणून अनुभवी व ज्येष्ठ अशा व आवडआणि क्षमता असणाऱ्या शिक्षकाची निवड केली जाते.

४९) कामाची आखणी करताना कामाचे स्वरुप, अनुभव क्षमता आणि कामाबाबत असणारी आस्था या गोष्टींचा विचार केला जातो.

५०) परीक्षांचे नियोजन करताना शिक्षक्र संख्या, वर्गखोल्या व फर्निचर या घटकांचा विचार केला जातो.

५१) वेळोवेळी घटक चाचण्या घेवून विद्यार्थ्यांना उत्तरे लिहिण्यासाठी मार्गदर्शन तसेच ज्यादा तास व प्रश्नपत्रिका सोडवून निकला वाढवण्याचा प्रयत्न केला जातो.

५२) भारत सरकारच्या सर्व प्रकारच्या सर्व प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्या व इ.बी.सी. सवलत मिळवून दिली जाते.

५३) माध्यमिक शाळेशी कनिष्ठ महाविद्यालय संलग्न असल्यामुळे तोटे कमी पण फायदे जास्त होतात.

५४) वरिष्ठ महाविद्यालयाला कनिष्ठ महाविद्यालया संलग्न असल्यामुळे विद्यार्थी जीवनावर व प्रशासनावर वाईट परिणाम होतो.

## विभाग – २

### ६.३.२ शिक्षकाकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे काढलेले निष्कर्ष

१) पंढरपूर शहरामध्ये स्वतंत्र स्वरुपाचे एकही कनिष्ठ महाविद्यालय नाही.

२) पंढरपूर शहरातील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये ९२ % शिक्षक कायमस्वरुपी पदावर कार्यरत आहेत.

३) सर्वच्या सर्व शिक्षक (१०० %) हे अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयामध्ये काम करतात.

४) जवळ–जवळ २० % शिक्षकांच्या मतानुसार कनिष्ठ महाविद्यालयामध्ये (म्हणजे एका) पिण्याचे पाणी, क्रीडांगण व जिमखाना इत्यादी सुविधा पुरेशा नाहीत.

५) ४२.९९% शिक्षकांच्या मते वर्ग खोल्याचे एकूण क्षेत्रफळ ४० x ९० फूट आहे. तर ३९.९९ % शिक्षकांनी ३० x ८० फूट क्षेत्रफळ तर १७.१४ % शिक्षकांच्या मते २५ x ६० फूट आहे असे सांगितले.

६) जवळ – जवळ १५% शिक्षक आपल्या कार्याचे वार्षिक नियोजन केव्हातरीच करतात.

७) कनिष्ठ महाविद्यालयातील ९% शिक्षक वर्ग अध्यापनाचे कधीच नियोजन करत नाहीत.

८) जवळ – जवळ ३८% शिक्षकांना अध्यापन कार्याचे नियोजन करताना इतरांचे सहकार्य कधीच मिळत नाही.

९) जवळ–जवळ ७०% शिक्षकांना प्रशासकीय कामे कधीच करावी लागत नाहीत पण ३०% शिक्षकांना प्रशासकीय कामे करावी लागतात.

१०) शिक्षकांना अध्यापनाबरोबरच अहवाल लेखन, हजेरी पत्रक तयार करणे व प्रवेश प्रक्रियेची कामे करावी लागतात.

११) शिक्षकांच्या अध्यापन कार्यावर प्रशासकीय कामाचा परिणाम होतो असे ३० % शिक्षकांनी सांगितले.

१२) जवळ - जवळ १८ % शिक्षक आपल्या अध्यापन कार्यामध्ये शैक्षणिक साधनांचा वापर करत नाहीत.

१३) शिक्षक अध्यापन कार्यामध्ये टेप रेकॉर्डर, ओ.एच.पी, एल.सी.डी. इत्यादी शैक्षणिक साधनांचा वापर करतात.

१४) जवळ - जवळ ८३ % शिक्षकांच्या मते अध्यापन कार्यासाठी लागणाऱ्या शैक्षणिक साधनांची पुरेशी उपलब्धता नाही.

१५) अध्यापनाचा दर्जा सुधारण्यासाठी शिक्षक सतत वाचन करतात, पाठ टाचण काढतात, व दृक - श्राव्य साधनांचा वापर करतात.

१६) जवळ - जवळ १८ % शिक्षकांच्या मते वर्ग खोल्या या गरजेपेक्षा कमी आहेत.

१७) जवळ - जवळ ४७ % शिक्षकांना वेळापत्रकाप्रमाणे अध्यापनाच्या तासिका मिळत नाहीत.

१८) आपल्या विषयाचा पाठ्यक्रम शिकवून वेळेत पूर्ण ६३ % शिक्षकांचा होत नाही.

१९) पाठ्यक्रम वेळेत पूर्ण न झाल्यास ५६ % शिक्षक काहीच उपाययोजना न करता स्वयंअध्ययन करण्यास सांगतात.

२०) बोर्ड परीक्षाची तयारी ज्यादा तासिका घेवून, प्रश्नपत्रिका सोडवून घेवून, सराव चाचण्या घेवून करुन घेतली जाते.

२१) हुशार विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी ०९% शिक्षक जादा तासिका घेत नाहीत. पण ९१ % शिक्षक घेतात.

२२) जवळ - जवळ २० % शिक्षकांना प्रशिक्षण वर्ग, सेवांतर्गत कार्यक्रमास पाठवले जात नाही.

२३) शिक्षकांना उद्‌बोधन वर्ग व सेवांतर्गत प्रशिक्षणाला पाठविल्यामुळे अध्यापनाचा दर्जा सुधारतो व नवविचार प्रवाहांची माहिती होते.

२४) जवळ - जवळ सर्वच कनिष्ठ महाविद्यालयामध्ये अभ्यास पूरक उपक्रम राबवतात.

२५) अभ्यासपूरक उपक्रमाचे नियोजन करताना शिक्षक प्राचार्यांचे मार्गदर्शन व सहकार्याचे सहकार्य घेतात.

२६) प्राचार्यांना प्रत्येक कामात ८८% शिक्षक सतत मदत करतात.

२७) जवळ - जवळ १५ % शिक्षकांच्या मते अभ्यासपूरक उपक्रम वेळेत घेतले जात नाहीत.

२८) माध्यमिकच्या वर्गावर ४ % शिक्षकांना कधीतरीच तासिका घ्यावा लागतात.

२९) ज्यांना माध्यमिक किंवा वरिष्ठ वर्गावर तासिका घ्याव्या लागतात त्यांच्या अध्यापनावर काही प्रमाणात परिणाम होतो.

**६.३ माध्यमिक शाळेशी संलग्न असलेल्या कनिष्ठ महाविद्यालय आणि वरिष्ठ महाविद्यालयाला संलग्न असलेल्या कनिष्ठ महाविद्यालयांच्या अंतर्गत प्रशासनातील अडचणीचे तुलनात्मक निष्कर्ष -**

**माध्यमिक शाळेशी संलग्न कनिष्ठ महाविद्यालयांच्या अडचणी -**

१) पुरेसा सेवक वर्ग कनिष्ठसाठी स्वतंत्रपणे नसल्यामुळे प्रवेशाच्यावेळी माध्यमिकच्या कर्मचाऱ्यांची मदत घ्यावी लागते.

२) तासिकांचा कालावधी कमी करावा लागतो. त्यामुळे योग्यपणे अध्यापन करता येत नाही.

३) इमारत अपुरी असल्यामुळे कॉलेजच्या कामकाजाचा वेळ कमी करावा लागतो. कारण माध्यमिकच्या वर्गासाठी इमारत मोकळी करावी लागते.

४) लहान मुलांचा गोंधळ - गोंगाट यामुळे शैक्षणिक वातावरण बिघडते.

५) माध्यमिकची विद्यार्थी प्रयोगशाळेच्या साहित्याची मोडतोड करतात.

६) ग्रंथालयामधील ग्रंथ, पुस्तके, मासिके व्यवस्थित राहत नाहीत.

**वरिष्ठ महाविद्यालयाशी संलग्न कनिष्ठ महाविद्यालयाच्या अडचणींचे निष्कर्ष -**

१) वरिष्ठ वर्गातील मुले राजकीय प्रवृत्तीचे बनलेले असतात. त्यामुळे त्याचाच परिणाम कनिष्ठच्या विद्यार्थ्यांवर होतो.

२) वरिष्ठ वर्गासाठी सतत प्रयोगशाळा उपलब्ध करून द्यावी लागत असल्यामुळे कनिष्ठच्या विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक कार्य करायला ज्यादा व पुरेसा वेळ मिळवून देता येत नाही.

३) ग्रंथालयामधून वरिष्ठ वर्गाच्या मुलांनी नेलेली पुस्तके, ग्रंथ वेळेत परत येत नाहीत त्यामुळे पुस्तकांची कमतरता जाणवते.

४) शांतता रोखता येत नाही.

५) कनिष्ठ वर्गाच्या शिक्षकांना वरिष्ठाच्या परीक्षांच्यावेळी पर्यवेक्षक म्हणून पाठवल्यामुळे तासिका मोकळ्या राहतात.

६) कनिष्ठच्या सेवक वर्गाला वरिष्ठ महाविद्यालयाची कामेच जास्त असतात. त्यामुळे कनिष्ठ महाविद्यालयाची कामे वेळेवर होत नाही.

## ६.४ शिफारशी

### ६.४.१ प्राचार्यांच्याविषयी शिफारशी

१) कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी संख्या मर्यादा ही ग्रामीण भागासाठी ४० व शहरी भागासाठी ६० असावी.

२) कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना माध्यमिक शाळेच्या तासिका देवू नये.

३) कनिष्ठ महाविद्यालय स्वतंत्र असावे व त्याचे कानकाजही स्वतंत्र असावे.

४) कनिष्ठ महाविद्यालयामधील भिंती बोलक्या असाव्यात.

५) प्राध्यापकांकडून अध्यापन विषयाचे वार्षिक नियोजन करुन घ्यावे.

६) वार्षिक नियोजनानुसार शिक्षक व कर्मचारी काम करतात की नाही याची सतत चौकशी करावी.

७) सेवांतर्गत प्रशिक्षणाचे व वेगवेगळ्या कार्यक्रमाचे फायदे लक्षात घेवून शिक्षकांना त्यासाठी पाठवावे.

८) शिक्षक नियुक्तीच्यावेळी प्राचार्यांना सल्ला द्यावा.

९) प्राध्यापकांच्या अध्यापनाचे प्रत्यक्ष वर्गात जाऊन पूर्ण एकतासाचे महिन्यातून किमान एखदातरी निरीक्षण करावे.

१०) कला शाखेचा निकाल हा इंग्रजी विषयावर अवलंबून असल्यामुळे इंग्रीजी विषयासाठी स्वतंत्र ज्यादा तासिकांची व्यवस्था करावी.

११) शास्त्र शाखेचा निकाल वाढविण्यासाठी गणित विषयाच्या तासिका ज्यादा घ्याव्यात.

१२) कनिष्ठ महाविद्यालयाकरिता पुरेसा व स्वतंत्र असा सेवक वर्ग असावा.

१३) विद्यार्थी संख्येच्या मानाने पुरेशी इमारत व वर्ग खोल्या आकाराने मोठ्या असाव्यात.

१४) कनिष्ठ महाविद्यालयासाठी स्वतंत्र ग्रंथालय असावे.

१५) ग्रंथालयामध्ये पुरेशी संदर्भ पुस्तके, मासिके, साप्ताहिके, वर्तमान, ग्रंथ इत्यादी असावेत.

१६) कनिष्ठ महाविद्यालयासाठी स्वतंत्र व पुरेशी प्रयोगशाळा असावी.

१७) कनिष्ठ महाविद्यालयासाठी स्वतंत्र व पुरेशी क्रिडांगण असावे. व त्यासोबत खेळाचे वेगवेगळ्या प्रकारचे आधुनिक साहित्य असावे.

१८) महाविद्यालयाच्या विकास कामासाठी शिक्षकांकडून देणगी स्वीकारू नये.

१९) कनिष्ठ महाविद्यालयामध्ये बोर्ड परीक्षांचे आयोजन करण्यापूर्वी सर्व प्रकारची अतिदक्षता घ्यावी. पर्यवेक्षक उपलब्ध करावेत.

२०) इयत्ता १२ वी साठी उन्हाळी व दिवाळी सुट्टीत ज्यादा तासिकांची व्यवस्था करावी.

२१) रात्र अभ्यासिकेची सोय करुन त्यावर शिक्षकांची नियुक्ती करावी.

## ६.४.२ शिक्षकांविषयी शिफारशी

१) शिक्षकांनी माध्यमिकच्या वर्गावर तासिका घेवू नयेत.

२) शिक्षकांनी आपल्या वार्षिक कामाचे नियोजन करावे.

३) शिक्षकांची आपल्या दैनंदिन अध्यापनाचे नियोजन करावे व त्यानुसार अध्यापन करावे.

४) शिक्षकांनी आपल्या विषयाच्या पाठ्यक्रम नियोजित वेळेत पूर्ण करावा.

५) शिक्षकांनी विद्यार्थी हजेरी समाधानकारक ठेवण्यासाठी प्रत्येक तासाला हजेरी घ्यावी.

६) गैरहजर विद्यार्थ्यांना पालकाला आणल्याशिवाय वर्गात घेवू नये.

७) बोर्ड परीक्षांच्यावेळी पर्यवेक्षक म्हणून काम करण्यापूर्वी त्यासंबंधात योग्य ती माहिती घ्यावी.

८) आपल्या विषयाच्या घटक चाचण्या, प्रात्यक्षिक कार्य वेळच्यावेळीच घ्यावे.

९) अभ्यासात मागे असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पुनर्रअध्यापन करावे.

१०) शिक्षकांनी स्वत: राजकीय वातावरणापासून दूर राहून विद्यार्थ्यांनाही दूर ठेवण्याचा प्रयत्न करावा.

११) ग्रंथालयाचा व इंटरनेटचा वापर करुन अध्यापनाचा दर्जा सुधारावा.

१२) अध्यापनाची पारंपारिक पद्धत सोडून वेगवेगळ्या पद्धती घटकानुसार व आशयानुसार वापराव्यात.

१३) शास्त्र शाखेच्या विद्यार्थ्यांकडून जास्तीत जास्त प्रायोगिक कृती करून घ्याव्यात.

## ६.५ पुढील संशोधनासाठी विषय

शैक्षणिक नियोजन आणि प्रशासन या विषयाची व्याप्ती फार मोठी आहे. परंतु ही व्याप्ती कमीत – कमी करुन संशोधकाने प्रस्तुत विषयावर संशोधन केलेले आहे. या संशोधन कार्यामध्ये प्रस्तुत विषयावर संशोधन केलेले आहे. या संशोधन कार्यामध्ये फक्त कनिष्ठ महाविद्यालयाच्या संस्थातर्गत नियोजन आणि प्रशासनाचाच अभ्यास केला आहे पण वेगवेगळ्या स्तरामध्ये नियोजन आणि प्रशासन आढळते. त्यामुळे या वेगवेगळ्या स्तरावर अंतर्गत प्रशासनाचाही अभ्यास होणे आवश्यक आहे. कारण काहीवेळा व्यापक अभ्यास करताना बाह्य गोष्टींवरती ज्यादा विचार केला जातो व अंतर्गत गोष्टी या दुर्लक्षित राहिल्या जातात. म्हणून या गोष्टीचे महत्व ओळखून त्यावर वेगवेगळ्या स्तरावर अभ्यास केला जावा. तरच शैक्षणिक नियोजन आणि प्रशासन प्रभावी व्हावे. यासाठी काही विषय हाती घेवून त्यात असणाऱ्या कमतरता टाळण्यासाठी संशोधन होणे आवश्यक आहे. त्यासाठी काही विषय पुढीलप्रमाणे दिलेले आहेत.

१) प्राथमिक शाळेच्या अंतर्गत शैक्षणिक नियोजन आणि प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास.

२) माध्यमिक शाळेच्या अंतर्गत शैक्षणिक नियोजन आणि प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास.

३) वरिष्ठ महाविद्यालयांच्या अंतर्गत शैक्षणिक नियोजन आणि प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास.

४) स्वतंत्र कनिष्ठ महाविद्यालये व संलग्नित कनिष्ठ महाविद्यालयाच्या अंतर्गत नियोजन आणि प्रशासनाचा तुलनात्मक अभ्यास.

५) स्वतंत्र कनिष्ठ महाविद्यालयांच्या निर्मितीसंबंधी पाहणी अभ्यास करणे.

६) इंग्लिश माध्यमाच्या प्राथमिक स्तरावरील शाळांच्या शैक्षणिक नियोजन व प्रशासनामध्ये येणाऱ्या अडचणींचा चिकित्सक अभ्यास.